सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३

महत्वाचे/कालमर्यादित.

क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/९४३
दिनांक :- २६/४/२०१५

प्रति,

प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी संस्था.
तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत.

संदर्भ :- १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/अर्थसं/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/०६ दिनांक १८ एप्रिल २०१५.
२) या कार्यालयाचे पृ.क्र.:-विकाअ/शिक्षण/आधारकार्ड/२०१५/१०२ दि. १३/१/२०१५.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/८४२ दि. १५/४/२०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, खाजगी विनाअनुदानित व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी सलग्न/लिंक करण्याबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहेत. तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्थास्तरावर कॅंप आयोजित करण्याबाबत सबंधित Agency शी समन्वय साधनेसाठी आपणास सुचना देण्यात आलेल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक सलग्न केलेले त्यांची कोअर बँकींगची सुविधा असलेले बँक खाते क्रमांक याची माहीती तंत्रशिक्षण संचालनालयाच्या dtemaharashtra.org.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/८४२ दि. १५/४/२०१५ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. परंतु असे निदर्शनास आले की, अद्यापही विद्यार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड क्रमांक तसेच बँक खात्याच्या तपशिलाची माहीती संगणक प्रणालीवर भरलेले दिसुन येत नाही. ज्या विद्यार्थ्यांना बँक खाते व आधारकार्ड क्रमांक अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही अश्या सर्व विद्यार्थ्यांकरीता आपण सबंधित एजन्सीशी संपर्क साधुन संस्थेमध्ये कॅंप आयोजित करावा किंवा सबंधित एजन्सीकडुन आधारकार्ड उपलब्ध करुन घेण्याबाबत आपणामार्फत विद्यार्थ्यांना सुचना द्याव्यात.

सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

तसेच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी सलग्न केलेली अद्ययावत माहीती दिनांक १५ मे २०१५ पर्यंत प्रणालीवर नोंदविणेबाबत कळवावे. विद्यार्थ्यांच्या बँक तपशिलाची माहीती संस्थाप्रमुखांनी प्रमाणित करुन या कार्यालयास दिनांक १८ मे २०१५ पर्यंत जमा करावी, याबाबत संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

S. P. Pusedkar

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.